# फलज्योतिष थोतांडच, विज्ञान नव्हे !

नी. र. वऱ्हाडपांडे



कालिदास विश्वविद्यालय व इतर काही विश्वविद्यालये यात फलज्योतिष शिकविण्याचा जो निर्णय घेण्यात आला त्याबद्दल उलटसुलट बरीच चर्चा झाली. या चर्चेतील काही मुद्दे वारंवार मांडले गेले. त्यावरून बुद्धिवंतांत ते बरेच स्वीकारार्ह आहेत असे दिसते. हे मुद्दे व त्यावरील माझे समालोचन असे :-


(१) ''विज्ञानाच्या मूळ सिद्धांतांचा विचार केला तर फलज्योतिषावरील पुष्कळसे आक्षेप अवैज्ञानिक आहेत असे म्हणता येते.''

हे विधान फारच बुचकळ्यात टाकणारे आहे. विज्ञान या शब्दाने भौतिकीचा उल्लेख अभिप्रेत असेल, तर ''भौतिकीची मूलतत्त्वे'' ही भाषा फारच ढिली आहे. न्यूटनच्या भौतिकीची मूलतत्त्वे कोणती? गतीचे नियम ? न्यूटनप्रणीत गतीचे नियम विश्वात पाहण्यात येणाऱ्या गतीचे अवलोकन करून बसविलेले आहेत. मूलतत्त्वाप्रमाणे आधीच गृहित धरलेले नाहीत.

आईन्स्टाइनच्या भौतिकीची मूलतत्त्वे कोणती ? साऱ्या गति सापेक्ष आहेत. हे सापेक्षतेच्या भौतिकीचे मूलतत्त्व नाही. सापेक्ष गती व निरपेक्ष गती यात कोणतेच व्यवच्छेदक सापडत नाही म्हणून आईन्स्टाइन गतीला सापेक्ष मानतो.

मूलतत्त्वे म्हणजे ज्याला यूक्लिडच्या भूमितीत axioms अथवा गृहिते म्हणतात. ती अभिप्रेत असतील तर अशी गृहिते फक्त शुद्ध गणितात घेतली जातात. प्रत्यक्षाधिष्ठित विज्ञानात नव्हे.

बरे गतीचे नियम व तिची सापेक्षता यांना मूलतत्त्वे म्हटले तरी



त्यावरून फलज्योतिष अवैज्ञानिक नाही हे कसे ठरते ?

"फलज्योतिषाचा व वरील सिद्धांताचा काहीच विरोध नाही. फलज्योतिष खरे मानले तर वरील सिद्धांत खोटे मानावे लागतील असे नाही." "ग्रहांचा मानवी व्यक्तीच्या भवितव्यावर परिणाम होऊ शकत नाही." असे विज्ञानाचे मूलतत्त्व नाही. तेव्हा फलज्योतिषात अवैज्ञानिक असे काय आहे ? असा हा युक्तिवाद दिसतो.

"ज्यांना मंगळ असतो त्यांचे मंगळ नसलेल्यांशी लग्न झाले तर लग्न सुखाचे होत नाही, असे फलज्योतिष सांगते. ही समजूत अवैज्ञानिक नाही. कारण विज्ञानाच्या कोणत्याच मूलतत्त्वाच्या आधारे ही समजूत चुकीची आहे, असे सिद्ध करता येत नाही." असे म्हटले तर ज्यांना बुध असतो त्यांचे लग्न सुखाचे होत नाही ही समजूत देखील विज्ञानाच्या कोणत्याच मूलतत्त्वाच्या आधारे खोटी ठरविता येत नाही. मग हीही खरी का मानू नये ?

काही प्रोफेसरांचे म्हणणे होते की, १९व्या शतकातील अप्रगत विज्ञानाच्या दृष्टीने फलज्योतिष असमर्थनीय असले तरी विसाव्या शतकातील प्रगत विज्ञानाने ते समर्थनीय ठरविले आहे. "न्यूटन, डार्विन यांच्या वैज्ञानिक संकल्पना आईन्स्टाइन, हैझनबर्ग वगैरेंच्या शोधांनी पार मोडकळीस निघाल्या."

हे विधान आक्षेपार्ह आहे. न्यूटनचे गतीचे नियम प्रकाशाच्या गतीला लागू नाहीत. एवढ्याचवरून ते एखाद्या उंच इमारतीच्या शिखरावरून खाली फेकलेल्या दगडाच्या गतीलाही लागू नाहीत असे ठरते काय ? प्रयोगसिद्ध सिद्धांत कधीच पार मोडकळीस निघत

नाहीत. एका विशिष्ट मर्यादेच्या बाहेर ते लागू नाहीत एवढेच नवीन शोधांनी स्पष्ट होते.

**जुने व नवे विज्ञान**

बरे समजा, विसाव्या शतकातल्या विज्ञानाने न्यूटन, डार्विन वगैरे सारे चूक ठरविले तरी त्याने फलज्योतिषाला बरोबर ठरविले असे त्यातून कसे निष्पन्न होते ?

''पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे बरोबर व सूर्य पृथ्वीभोवती फिरतो हे चूक असे म्हणता येत नाही. कारण आईन्स्टाइनच्या मते गती सापेक्ष असल्यामुळे दोन पदार्थ जर एकमेकांपासूनचे अंतर बदलत असतील, तर ते दोघेही फिरत आहेत असे म्हणता येते. विसाव्या शतकातील विज्ञानाने १९व्या शतकाने चूक ठरविलेले जुने मत बरोबर ठरविले. यावरून जुन्या विश्वासांना १९व्या शतकातील विज्ञानाप्रमाणे अंधश्रद्धा म्हणणे बरोबर नाही, असा हा युक्तिवाद दिसतो.''

असा युक्तिवाद केला तर फलज्योतिषच कशाला. ''अंधश्रद्धा अशी काही चीजच नाही आधुनिक विज्ञानाप्रमाणे सगळेच बरोबर आहे.'' असे का म्हणू नये ?

वस्तुतः पृथ्वीच्या स्थिरतेबद्दलचे जुने मत सापेक्षतेच्या सिद्धांताने बरोबर ठरविले हे म्हणणेच बरोबर नाही. पृथ्वी व सूर्य यांची परस्परांपासूनची अंतरे बदलत असतील, तर त्यापैकी एक स्थिर आहे तर दुसरा फिरतो हे म्हणणे चूक आहे, तर असे सापेक्षता सांगते. म्हणजे सूर्य स्थिर आहे या नव्या मताप्रमाणेच पृथ्वी स्थिर आहे हे जुने मतही सापेक्षतेच्या सिद्धांताप्रमाणे चूकच आहे.

**(२) काही तत्त्वज्ञांनी पुढील मत मांडले :-**

''विश्व ही एक अति जटिल व्यवस्था असून तू पृथ:क्करणाने कळणे कदापि शक्य नाही, यावर आता वैज्ञानिकांचे एकमत आहे.''

हे विधान कोणत्या वैज्ञानिकाने केले आहे ?

पृथ:क्करण या शब्दाने विश्लेषण म्हणजे analysis अभिप्रेत आहे असे दिसते. Analysis is falsification हे मत बर्गसॉ या तत्त्वज्ञाने मांडले आहे. ते कोणा वैज्ञानिकाने मांडल्याचे ऐकिवात नाही. बर्गसॉ याच्या या मताचा रसेल व ईलियट यांनी खरपूस समाचार घेतला आहे. विश्लेषणाशिवाय विज्ञान एक पाऊलही पुढे टाकू शकत नाही. माणूस समस्या कशा सोडवितो याचे विश्लेषण केल्याशिवाय समस्या सोडविणारे संगणक कदापि बनवता आले नसते.

पृथ:क्करण हे असत्यीकरण आहे, हे बर्गसॉचे मत फलज्योतिषाला कसे काय पोषक आहे हेही अगम्य आहे. ''पृथ:क्करण करणे चूक असल्यामुळे खरे व खोटे यांना पृथक मानू नये, असे म्हणणे असेल तर फलज्योतिष ही अंधश्रद्धा आहे हे विधानही चूकही नाही व बरोबरही नाही असे म्हणायला हे विद्वान तयार आहेत काय ?

(३) पुढील प्रश्न अनेक वेळा विचारण्यात आला-

''ग्रहांचा व मानवाच्या भविष्याचा निश्चित संबंध काय हे सांगता येत नाही, म्हणून फलज्योतिष खोटे मानायचे तर सिगरेट व हृदयरोग यांचा निश्चित संबंध सांगता येत नाही, म्हणून बुद्धिवाद्यांनी आयुर्विज्ञान देखील खोटे का मानू नये ?''

**चुलीवरचे पाणी**

निश्चित संबंध म्हणजे काय ? चुलीवर पाणी ठेवले की उकळते हा विस्तवाचा व पाणी उकळण्याचा संबंध निश्चित आहे की नाही ? चुलीवर पाणी ठेवले व कधीच उकळले नाही असे कधीच होत नाही. यावरूनच आपण विस्तवाच्या पाणी उकळण्याच्या शक्तीवर विश्वास ठेवतो ना ? तसेच सिगरेट प्यायल्याने हृदयरोग होतो या नियमाचे आहे.

विस्तवावर पाणी ठेवल्याने उकळते या नियमाला अपवाद नाही. उलट सिगरेट प्यायल्याने हृदयरोग होतो याला पुष्कळ अपवाद आहेत, असे यावर म्हणण्यात येईल. पण तसे नाही. विस्तवावर ठेवलेले पाणी उकळेल की नाही हे विस्तवाची शक्ती किती व पाण्याची मात्रा किती यावर अवलंबून आहे. पणतीवर गंजभर पाणी ठेवले तर वा चुलीमध्ये व पाण्यामध्ये १० फूट अंतर असेल, तर चुलीतील विस्तवावर ठेऊनही पाणी उकळणार नाही. म्हणजे विस्तवाने पाणी उकळते हा नियम विस्तवाची उष्णतादायक शक्ती व पाण्याची उष्णतारोधक शक्ती यावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे धूम्रपान व हृदयरोग यांचा संबंध धूम्रपानाची रोगकारक शक्ती व हृदयाची रोगप्रतिकारक शक्ती यावर अवलंबून आहे. सिगरेटच्या मालिका पिऊनही ज्यांना हृदयरोग झाला नाही त्यांच्या व ज्याला दिवसामागे केवळ वीस-पंचवीस सिगरेट ओढल्याने हृदयरोग झाला. त्यांच्या रोगप्रतिकार शक्तीत फरक असतो. हा फरक सिगरेट पिणे सुरू करण्याच्या आधी वैद्यकीय तपासणी करून घेतली तर काही अंशी सांगता येईल. त्यामुळे सिगरेटने हृदयरोग होण्याचे प्रमाण घटू शकेल. आयुर्विज्ञानात भौतिकीच्या मानाने अज्ञाताचे क्षेत्र मोठे असल्यामुळे सिगरेट व हृदयरोग यांचा कार्यकारणभाव पाणी उकळणे व विस्तव यांच्या कार्यकारणभावाइतका आज निश्चित करता येत नाही. पण तेवढ्याचवरून सिगरेटचा व हृदयरोगाचा कार्यकारणभाव नाकारणे याला कोणी बुद्धिवाद म्हणत असेल, तर ते बुद्धिवादाचे घोर अज्ञान आहे.

विज्ञान बुद्धिवादावर आधारलेले आहे ही सार्वत्रिक समजूत साफ चुकीची आहे. बुद्धीने सत्य कळत नाही, ते प्रत्यक्षाने कळते. बुद्धीने फक्त 'क्ष' हे विधान 'य' या विधानाशी सुसंगत आहे की नाही, 'अ' या विधानाच्या आधारे 'ब' हे विधान सिद्ध करता येते की नाही एवढेच सांगू शकते. पण क्ष,य,अ,व ब ही विधाने खरी की खोटी हे सांगू शकत नाही. ते करण्यासाठी प्रत्यक्ष अवलोकन करावे लागते. तसेच तंबाखू व हृदयरोग यांचा कार्यकारणभाव आहे की नाही हे नुसत्या बुद्धीने व तर्काने कधीच कळू शकणार नाही. त्यासाठी सिगरेट ओढणाऱ्या व न ओढणाऱ्या सहस्रावधी लोकांची हृदये तपासून त्यांची तुलना केली पाहिजे.

**अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आव्हान**

(४) नुकतेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या काही सदस्यांनी ज्योतिष संमेलनासाठी जमलेल्या ज्योतिषांना काही कुंडल्या दाखवून त्या वर्तविण्याचे आव्हान दिले. या आव्हानावर टीका

करताना एक विद्वान म्हणाले-

अंधश्रद्धा निर्मूलनवादी म्हणतात, 'या घ्या दहा जन्मकुंडल्या. फलज्योतिषाच्या आधारे सांगा यातील जिवंत माणसांच्या किती?' (अंधश्रद्धा निर्मूलनच्या आव्हानामध्ये कोणती कुंडली स्त्रीची व कोणती पुरुषाची ? असाही एक प्रश्न होता.) विसाव्या शतकाच्या विज्ञानात हा प्रश्न असा राहील की दहा कुंडल्यांपैकी जिवंत माणसाच्या कोणत्या याची शक्यता सांगा?

येथे मूळ शुद्ध वैज्ञानिक असलेला प्रश्न बिघडवून अवैज्ञानिक करण्यात आला आहे. एक तर ज्या सांख्यिकीच्या आधारे हा प्रश्न विचारला जातो ती शक्यतेचा म्हणजे possibility चा विचार करीत नसून संभाव्यतेचा म्हणजे probability चा विचार करते. वंध्या पुत्र, चौकोनी वर्तुळ, 'अ हा अ नाही' हे वदतोव्याघात सोडले तर सर्व काही शक्य आहे. अरबी गोष्टीतील जादूची सतरंजी व मिडास राजाने ज्या वस्तूला हात लावला ती सोन्याची होत असे. यात अशक्य काही नाही. कारण असे सांगणारी विधाने वदतोव्याघाताच्या रूपाची नाहीत.

पण विज्ञानात अशा शक्यतांचा विचार करायचा नसतो. एखादे विधान विज्ञानात विचारणीय ठरण्यासाठी ते नुसते व्याघातमय नाही एवढेच पुरेसे नाही. ते संभाव्य असले पाहिजे. म्हणजे ते खरे असावे असे मानण्यासाठी थोडातरी पुरावा असणे आवश्यक आहे. असा प्राथमिक पुरावा फलज्योतिषासाठी आहे असे गृहित धरले, तर त्याचे आखाडे संभाव्यतेच्या कक्षेत येतात. पण ही संभाव्यता किती आहे हे कुंडलीवरून भविष्य वर्तविणाऱ्याला सांगता येणार नाही. कारण फलज्योतिषाच्या कोणत्याही ग्रंथात कोणत्या भविष्याची संभाव्यता किती हे दिलेले नसते. किंबहुना फलज्योतिषात संभावता ही कल्पनाच नाही. ''आपल्या ज्योतिषांना संभावतेचा सिद्धांत हजारो वर्षे आधीच कळला होता'' हे एक निराधार विधान आहे. हजारो वर्षे आधी तर सोडाच आजदेखील तुम्ही एखाद्या ज्योतिषाला, तुझ्या भविष्यांची संभाव्यता किती ? असे विचारले तर त्याला या प्रश्नाचा अर्थदेखील कळणार नाही. ''कुंडली बरोबर वाचली तर भविष्य खरेच ठरणार व चुकीची वाचली तर खोटेच ठरणार!'' असे फलज्योतिषी समजतो. खरे व खोटे यांच्या मधला पर्याय फलज्योतिषाला माहीत नाही. त्यामुळे फलज्योतिषाचे सत्यत्व पारखू पाहणारा कोणताही वैज्ञानिक तुमच्या भविष्याच्या सत्यतेची संभाव्यता काय ? असे फलज्योतिषाला कधीही विचारणार नाही.

फलज्योतिषाला जे माहीत नाही ते सांख्यिकीला माहीत आहे. फलज्योतिष ही नुसती थापेबाजी असेल, तर त्याने वर्तविलेली भविष्ये केवळ यदृच्छेने खरी ठरतील. फलज्योतिषाची भविष्ये खरी ठरण्याची संभाव्यता काय याचे गणित करता येते. फलज्योतिषाला दहा कुंडल्या देऊन त्यापैकी जी त्याला मृताची वाटत असेल तिच्यामागे 'मृ' व जी जीविताची असेल तिच्या मागे 'जी' लिहिण्यास सांगावे. दहापैकी तीन कुंडल्या मृताच्या असतील तर केवळ यदृच्छेने 'मृ' हे उत्तर बरोबर निघण्याची संभाव्यता ३/१० व जीविताची आहे हे उत्तर बरोबर असण्याची संभाव्यता ७/१० आहे. ज्योतिषाने सर्व मृतांच्या कुंडलीच्या मागे 'मृ' व जीवितांच्या कुंडलीमागे 'जी' लिहिले असेल, तर त्याची सर्व उत्तरे बरोबर ठरतील याची संभाव्यता (३/१०) x (७/१०)= २१/१०० आहे. ज्योतिषी केवळ टोले मारत नसून त्याच्या जवळ कुंडल्यांच्या बाबतीतले सत्य कळून घेण्याचे काही साधन आहे हे सिद्ध व्हायचे असेल तर त्याची उत्तरे २१/१०० पेक्षा जास्त वेळा बरोबर आली पाहिजेत.

फलज्योतिषाचे सत्यापन करण्यासाठी दहाच कुंडल्या पुरेशा नाहीत, असे काही आक्षेपक म्हणाले. हा आक्षेप बरोबर आहे. पण ज्योतिषी दहा कुंडल्या वर्तविण्यास तयार झाले तरच त्यांना शंभर देता येतील ना ? ते जर आव्हान न स्वीकारता नुसताच पळ काढतात, तर दहा कुंडल्या पुरेशा नाहीत हे अंनिस. ला सांगून काय उपयोग आहे ? ते पळ काढणाऱ्या ज्योतिषांना सांगितले पाहिजे.

**सांख्यिकीचा पुरावा**

न्यायालयात साक्षीदाराचा खरेपणा पाहण्यास जे निकष वापरतात त्यांचाही अंतर्भाव वैज्ञानिक पद्धतीमध्ये होतो. यातला एक निकष असा आहे की, साक्षीदार उत्तर देण्याची बुद्ध्या टाळाटाळ करीत असेल तर तो खोटा आहे असे समजावे.

या तत्त्वाप्रमाणे ज्योतिषी पहिल्या चेंडूतच बाद होतात. कारण जेथे विचारणाऱ्याला सत्य माहीत असते तेथे कुंडली वर्तविणे ते हमखास टाळतात. वर्षानंतर काय होईल हे ज्यातून सहज पळवाटा काढता येतील अशा भाषेत ते सांगायला तयार असतात. पण ज्याची कुंडली तुमच्या समोर आहे तो जिवंत की मेलेला याचे उत्तर ते कधी

देणार नाहीत. कारण त्याचे उत्तर खरे की खोटे हे तत्काळ कळू शकते.

अंनिस च्या आव्हानाबद्दल बोलताना एक ज्योतिषी म्हणाले, "कुंडलीच्या आधारे स्त्री-पुरुष व जीवित वा मृत ओळखता येतात, हे यात गृहित धरलेले आहे. तेव्हा या आव्हानाचा पायाच अज्ञानग्रस्त आहे." मी त्यांना विचारले की, कुंडलीवरून जर हा माणूस जिवंत की मेलेला हे सांगताच येत नाही तर ज्योतिषी मृत्युयोग कसा वर्तवितात ? कुंडलीवरून जर स्त्री वा पुरुष एवढेदेखील ओळखता येत नाही तर कुंडली पाहून, या व्यक्तीला सासूपासून त्रास होईल असे चेहरा लांब करून ज्योतिषी का सांगतात?

तेव्हा आमच्या आव्हानाने फलज्योतिष हे थोतांड असल्याचे सिद्ध झाले, असे जर अंनिस ने म्हटले तर तिला दोष देता येणार नाही.

**संभाव्यता**

(५) ज्या संभाव्यतेचा व सांख्यिकीचा वर हवाला देण्यात आला आहे. त्या सांख्यिकीने व संभाव्यतेच्या तत्त्वानेच 'फलज्योतिष हे थोतांड आहे' असे निर्विवादपणे सिद्ध केले आहे. गोखले इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. दांडेकर हे मोठे सांख्यिकी होते. त्यांनी सोळाशे जोडप्यांच्या पत्रिका गोळा केल्या. त्यावरून ज्योतिषांना त्या जोडप्यांच्या विवाह जीवनाविषयी अनुमाने करायला सांगितले. ही अनुमाने प्रत्यक्ष जोडप्याचे जीवन तपासून काढलेल्या निष्कर्षाशी कितपत जुळतात हे पाहण्यासाठी या दोन वर्णनात किती संबंध आहे याचे गणित करावे लागते. ते दांडेकर यांनी 'काय स्क्वेअर नावाची' सांख्यिकीची कसोटी वापरून केले. यावरून ज्योतिषांच्या विधानाचा सत्याशी असलेला संबंध फक्त काकतालीय होता हे सिद्ध झाले. प्रा दांडेकर यांचे संशोधन महाराष्ट्र टाइम्स मध्ये प्रसिद्ध झाले होते.

पाश्चात्य देशात सिल्व्हरस्मिथ या वैज्ञानिकाने याहूनही मोठ्या प्रमाणावर पाहणी करून फलज्योतिषाबद्दल असाच निष्कर्ष काढला आहे.

फलज्योतिषांना जो प्रश्न विचारण्याची वर सूचना करण्यात आली आहे तो डॉक्टरांना विचारता येईल. कारण डॉक्टरने दिलेल्या औषधाने संबंधित व्याधिता सारखाच व तितक्याच तीव्रतेचे व्याधी झालेले किती लोक बरे झाले याचे आकडे उपलब्ध असतात. साऱ्या जगातील इस्पितळात त्या औषधाचा वापर होत असतो. संशोधनासाठी त्यांची नोंदही ठेवण्यात येते. तेव्हा माझ्या औषधाने हा व्याधित बरा होण्याची संभाव्यता किती हे डॉक्टरला सांगता येऊ शकते. अशा तऱ्हेच्या नोंदी फलज्योतिषाबद्दल कुठेच उपलब्ध नाहीत.

**फलज्योतिष व भारतीयता**

"औषध लागू झाले नाही तर लोक डॉक्टरला दोष देतात आयुर्विज्ञानाला नाही. उलट भविष्य खोटे ठरले तर लोक ज्योतिषाला दोष न देता त्याचे शास्त्रच खोटे आहे असे म्हणतात." म्हणून कधी कधी जो कांगावा केला जातो त्याचे उत्तर यात आहे.

कधी कधी फलज्योतिष ही खास भारतीय विद्या आहे. तिला थोतांड मानणारे भारतद्वेष्टे व पाश्चात्यधार्जिणे असले पाहिजेत हा ग्रह स्पष्टपणे डोकावतो. हा ग्रहही निराधार आहे. अंधश्रद्धा ही फक्त भारतीयांची मिरास नाही. साऱ्या जगातच फलज्योतिषाचा प्रचार आहे. मग निरनिराळ्या देशातील कुंडली वाचण्याच्या पद्धती निरनिराळ्या का असेनात, पाश्चात्य विश्वकोशदेखील याचा प्रतिवाद करीत नाही. तेव्हा फलज्योतिषाचा कैवार घेणे व भारतीयत्वाचा अभिमान बाळगणे होय. हाच मूळात एक भ्रम आहे.

शिवाय वैज्ञानिक चर्चेत भारतीयत्व व पाश्चात्यत्व यांचा विचारच अप्रस्तुत आहे. विज्ञान "खरे की खोटे ?" या एकाच प्रश्नाचे उत्तर मागते. भारतीय की अभारतीय हा त्याच्यापुढे प्रश्न नाही.

- नी. र. वऱ्हाडपांडे
३८, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती मार्ग,
नागपूर - ४०० ०१०.